Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या विकासात योगदान

**बोर्डे श्रध्दा अशोकराव**
संशोधक विद्यार्थी

**गोषवारा :**

महाराष्ट्रातील अनेक महापुरूषांपैकी यशवंतराव चव्हाण हे एक आहेत. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार उत्कृष्ट व कर्तव्यदक्ष प्रशासक, साहित्य रसिक, उत्तम राजकारणी, संवेदनशील लोकप्रिय अशा विविध अंगानी यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तीमत्व संपन्न होते. मराठी भाषीक महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासामध्ये दिलेले योगदान खुपच महत्वपुर्ण आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला खुप महत्व दिले.

**बीजसंज्ञा :—** महाराष्ट्र, विकास.

**प्रस्तावना :—**

स्वातंत्र्यानंतरच्या महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणावर ज्या व्यक्तींनी प्रभाव पाडला त्यामध्ये यशवंतराव चव्हाण हे एक प्रमुख व्यक्तीमत्व होते. यशवंतराव चव्हाण जसे उत्कृष्ट व कर्तव्यदक्ष प्रशासक, मुरब्बी राजकारणी, कलाप्रेमी, रसिक मनोवृत्तीचे होते तसेच त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत अग्रभागी होते त्यावेळी त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात कारावासही भोगला. यशवंतराव चव्हाण हे चळवळीतुन आलेले नेते होत सन १९४६ साली विधानसभेत प्रवेश केल्यापासुन नंतर सुमारे तीस वर्षे त्यांनी मुख्यमंत्री व मंत्रीपद भूसविले यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून जी कामगिरी केली तिने ते महाराष्ट्राच्या विकासाचे शिल्पकार ठरतात. त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासावर भर दिला.

**संशोधन पध्दती :—**

सदरील शोध निबंधासाठी विषयाच्या अनुसंगाने विविध द्वितीयक स्त्रोताचा उपयोग करण्यात आलेला आहे यामध्ये प्रामुख्याने प्रकाशित अप्रकाशित साहित्य लेख, मासिके, वृत्तपत्रे साप्ताहिके संदर्भग्रंथ इंटरनेट यांचा उपयोग करण्यात आला.

**यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या विकासात योगदान :—**

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वागींण विकासाला चालना दिली.सहकार चळवळीला प्राधन्य देवुन ग्रामीण महाराष्ट्राचे पुनरूत्थान झाले त्याच्या धोरणामुळे सहकारी

साखर कारखाने, सुत गिरण्या, कापड कारखाने अनेक छोटे—मोठे उदयोग सुरू करण्यास प्राधान्य देवुन औदयोगिक विकासाला चालना दिली. सहकार क्षेत्राकडे त्याचे विशेष लक्ष होते.

मोफत शिक्षणाची योजना महाराष्ट्रात प्रथम यशवंतराव चव्हाणांनी सुरू केली शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या समाजासाठी १०० रू. वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांमुलीना मोफत शिक्षण देण्याच्या क्रांतीकारी कार्य केले. औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर या दोन्ही विद्यापीठाच्या उभारणीमध्ये त्यांनी मोलाचे कार्य केले.

आश्रमशाळाची योजना आणली. औरंगाबाद आणि कराड येथे दोन नविन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय त्यांच्या काळात घेण्यात आला सातारा येथे सैनिकी शाळेची स्थापना हे सैनिक शिक्षण क्षेत्रातील यशवंतराव चव्हाण यांचे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. हे भारतातील पहिले सैनिकी स्कुल होय. विविध ठिकाणी तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध केल्या.

यशवंतराव चव्हाण यांना नाटयकलेची विशेष आवड होती. त्यासाठी विविध उपक्रम सुरू केले. नाटय, साहित्य व संगीत यांना दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले.

महाराष्ट्रातील औदयोगिक कंपन्याच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी मुंबई राज्य आर्थिक मंडळाची स्थापना केली आणि ती समस्या सोडविली. याशिवाय होमगार्ड संघटनेची बांधणी करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.

पंचायत राज व्यवस्था सत्तेंचे विकेंद्रीकरणासाठी ही योजना १ मे १९६२ ला अंमलात आली त्या योजनेची अंमलबजावणी करणारे महराष्ट्र हे पहिले राज्य होते. जिल्हा परिषदांची निर्मिती ही यशवंतरावानी महाराष्ट्राला दिलेली अनमोल देणगी होय. त्यांनी पंचायत मंडळाची स्थापना केली. शेतीच्या आधुनिककीकरणावर त्यांनी भर दिला त्यासाठी त्यांनी कोयना, जायकवाडी सारखी धरणे, जलविद्युत योजना, थर्मल विद्युत स्टेशनाची निर्मिती केली. विविध पाटबंधारेचे कार्यक्रम हाती घेतले.

महाराष्ट्र राज्य कल्याणकारी व्हावे या दृष्टीने यशवंतराव चव्हाणांनी वाटचाल सुरू केली होती त्या दृष्टीकोनातुन विकास कार्यांचा आणि लोकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न केला.

शिक्षण, शेती, सहकार, अर्थव्यवस्था, सिंचन सुविधा, कला, वाड्मय भाषा, साहित्य व संस्कृती कृषीउदयोग, औद्योगिक कारखाने सहकारी क्षेत्रात यातील समस्यांचा अभ्यास करून

त्यांनी योग्य निर्णय घेवुन त्यांची अमंलबजावणी केली त्यामुळे महराष्ट्रात शैक्षणिक आर्थिक औदयोगिक, सामाजिक, कृषी, सहकार, राजकीय क्षेत्रात कायापालट झाला याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाणाच्या दुरदृष्टीला जाते.

**निष्कर्ष :—**

सदरील शोध निबंधामधुन स्पष्ट होते की सर्वसामान्य लोकाच्या हितासाठी, कल्याणासाठी यशवंतराव चव्हाणांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक व कृषीविषयक, सहकार, राजकीय क्षेत्रात कायापालट झाला. देशातील स्थिर पुरोगामी व सर्व बाबतीत अग्रेसर व जागृत अशी महाराष्ट्राची प्रतिमा झाली आजही कायम आहे. याचे सर्व श्रेय यशवंतराव च्या पुरोगामी दृष्टीला आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. यशवंतराव चव्हाण, (२०१२), युगांतर, पुणे , कॉन्टिनेटल प्रकाशन.
२. यशवंतराव चव्हाण, (२०१७), कृष्णकांठ, पुणे, रोहन प्रकाशन.
३. यशवंतराव चव्हाण, (१९९२) सहयाद्रीचे वारे मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण.
४. लोकराज्य, मासिक, मार्च २०१२
५. मुक्त विद्यापीठ, संवाद पब्लिक, जुलै—ऑगस्ट २०१३.